# गणेशोत्सवात आरतीनंतर म्हणावयाचे सामूहिक संकल्प









## संकल्प

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची !
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची !!

खरोखर देशाच्या हितासाठी आणि
उन्नतीसाठी आम्हा सर्वांच्या हातून
सामूहिकरीत्या काही मोठे कार्य घडावे
अशी तळमळ मनात धरून
आम्ही एकत्र जमत आहोत.

हे विघ्नहर्त्या श्रीगणेशा,
आमच्या संकल्पाला
तुझे शुभाशीर्वाद असू देत.
हे गणराया, तू संघटनेची देवता आहेस.
तुला स्मरून आम्ही असा संकल्प करतो की
आम्ही सर्व एकदिलाने राहू.

हाती घेतलेले कार्य सिद्धीस नेण्याचा
सर्व शक्तिनिशी प्रयत्न करू.
'व्यक्तीपेक्षा कार्य मोठे असते',
हा मंत्र आम्ही सदैव लक्षात ठेवू.
आणि त्यानुसार कार्याच्या हितासाठी
वैयक्तिक स्वार्थाला तिलांजली देऊ.

हे बुद्धिदायका,
तू सर्व विद्या आणि कलांचा अधिष्ठाता आहेस.
आमच्या देशात जीवनाच्या सर्व क्षेत्रांत,
सदैव नवीन संशोधन व्हावे,
ते ज्ञान समाजाच्या कारणी लागावे
आणि त्यातून सर्व समाजाचे जीवन
संपन्न आणि समृद्ध बनावे,
असा प्रयत्न करण्याची बुद्धी
तू आम्हा सर्वांना दे.

हे परमेशा,
तुझ्या पावित्र्याची विटंबना
आमच्या हातून कधीही न घडो
विद्येचे व्यसन आणि सत्कार्याचे व्यसन
ही दोनच व्यसने आमच्या मनात असोत.
अन्य सर्व व्यसनांपासून
आम्हाला मुक्त कर आणि अशाप्रकारे,
हा समाज सद्गुण-संपन्नतेकडे वाटचाल करो !









ज्ञान प्रबोधिनीच्या 'गणेश प्रतिष्ठापना' या पोथीमधून

# श्री गणेशाथर्वशीर्ष (मराठी समश्लोकी)

ॐ नमस्ते गणपते, तूचि प्रत्यक्ष तत्त्व सत् ।
तूचि केवल कर्ता बा, तूचि धर्ताहि केवल ।।
तूचि केवल संहर्ता, तूचि ब्रह्महि सर्व हे ।
तू साक्षात् नित्य तो आत्मा । १ । ऋत नी सत्य मी वदे ।। २।।

करी रक्षण तू माझे वक्त्या-श्रोत्यांस रक्ष तू ।
दात्या-घेत्यांस तू रक्ष, गुरू-शिष्यांस रक्ष तू।।
मागुनी पुढुनी डाव्या उजव्या बाजुने पण
वरुनी खालुनी गझे सर्वथा कर रक्षण ।। ३ ।।

जसा वाङ्‌मय आहेस, तू चिन्मयहि वा तसा।
'जसा आनन्दं-मय तू, तू बह्म-मयही तसा ।।
देवा तू सच्चिदानन्द, अद्वितीयहि तू तसा ।
प्रत्यक्ष ब्रह्म तू, ज्ञान-विज्ञान-मयही तसा ।। ४ ।।

२. सर्व हे जग उत्पन्न तुझ्यापासूनि होतसे ।
त्याची स्थिती तुझ्यायोगे, विलयेल तुझ्यात ते ।।
भासते ते तुझ्या ठायी, तू भूमि जल अग्नि तू ।
तूचि वायू नि आकाश, वाणी-स्थाने हि चार तू ।। ५ ।।

तू जसा त्रिगुणां-पार त्रिदेहांच्याहि पार तू ।
तू अवस्था-त्रयां-पार त्रिकालांच्याहि पार तू ।।
तू मूलाधार-चक्रात देहाच्या नित्य राहसी ।
इच्छा-ज्ञान-क्रिया-रूपी शक्ती त्या तूचि तीनही ।।
ध्याती नित्य तुला योगी, तू ब्रह्मा तूचि विष्णुही ।
तू रूद्र इन्द्र तू अग्नी, तू वायू सूर्य चन्द्रही ।।
तू ब्रह्म, तूचि भू, तूची अन्तरिक्ष नि स्वर्गही ।
तूचि ॐकार हे बीज, वर्णिती ज्यास वेदही ।। ६ ।।

आधी 'ग' कार-उच्चार, 'अ'कार तदनन्तर ।
त्यानंतर अनुस्वार अर्धचन्द्रे सुशोभित ।।
ॐकार-युक्त हे बीज मन्त्ररूपचि हे तव ।
३. 'ग' कार रूप हे पूर्व, असे मध्यम रूप 'अ' ।।
अन्त्य रूप अनुस्वार, बिन्दू उत्तर रूपसा ।
नाद सांधतसे यांना, सन्धीचे नाम संहिता ।।
गणेश-विद्या ती हीच, आहे गणक हा ऋषी ।
छन्द हा निचृद्-गायत्री, देवता श्रीगणेश ही ।।
'ॐ गँ' रूपी गणेशाला नमस्कार सदा असो ।। ७ ।।

एकदन्तास त्या आम्ही देवाधीशास जाणतो ।।
आणि त्या वक्रतुण्डाते आम्ही ध्याने उपासतो ।
त्यासाठी सर्वदा आम्हा तो दन्ती प्रेरणा करो ।। ८ ।।

एकदन्ता चतुर्हस्ता पाश-अंकुश-धारका ।
दन्त नी वरदा मुद्रा धारका मूषक-ध्वजा ।।
लम्बोदरा रक्तवर्णा शूर्प-कर्णा गजानना ।
रक्त-वस्त्रा विघ्न-हर्त्या गिरिजानन्द-वर्धना ।।
रक्त-चन्दन-लिप्तांगा रक्त-पुष्प-सुपूजिता ।
भक्तावरी दया-कर्त्या अच्युता जग-कारणा ।।
सृष्टिपूर्वी प्रकटल्या, प्रकृती-पुरुषा-परा ।
या ध्यातो नित्य तो योगी योग्यांमध्ये वरिष्ठसा ।। ९ ।।

वन्दन प्रमथेशाला, एकदन्तास वन्दन ।।
लम्बोदरा शिवसुता विघ्नहर्त्यास वन्दन ।।
वांछिला वर देणाऱ्या तव नूर्तीस वन्दन ।। १० ।।

फलश्रुति

अथर्वशीर्ष अभ्यासे ब्रह्मभावास पात्र तो ।
न बाधा त्यास विघ्नांची, सर्वथा सुख पावतो ।।
महापापांतुनी पाची भक्त तो मुक्त होतसे ।
सायंकाळी जपे त्याचे दिन-पातक जातसे ।।
सकाळी जो जपे त्याचे रात्रिपाप निनष्ट हो ।
सकाळ-सांज जपता पूर्ण विष्पाप होई तो !!
सर्वत्र जो जपे त्यासी विघ्न बाधा न होतसे ।
धर्मार्थ-काम-मोक्षांचा तयासी लाभ होतसे
अथर्वशीर्ष ना द्यावे कुणा शिष्य अपात्रशा ।
जो मोहाने तया देई लागे पाप अती तया ।।
सहस्त्रांवर्तने याची करिता इच्छिले मनी ।
जे जे, ते सर्वही लाभे तया भक्तास या जनी ।। ११ ।।

जो याने श्रीगणेशाला अभिषेक सदा करी ।
तो त्यामुळे जगी होई थोर वक्ता खरोखरी ।।